महाराष्ट्राच्या ग्रामीण व शहरी भागातील लोकप्रिय दैनिक

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई • नवी मुंबई • ठाणे • रायगड • पालघर

https://jeevandeepvarta.com

मुख्य संपादक - रवींद्र घोडविंदे

Rs.2/-

बुधवार ■ 22 जानेवारी 2025 ■ वर्ष 6 ■ अंक 208 ■ RNI NO : MAHMAR/2016/72091 ■ Postal Reg. No. THC/256/2022-2024

# दावोसमध्ये महाराष्ट्राचा डंका

## पाच लाख कोटींची गुंतवणूक

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता :: प्रतिनिधी**

सध्या मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे दावोसच्या दौऱ्यावर आहेत. दावोस मधून महाराष्ट्रासाठी मोठी बातमी समोर आली आहे. ती म्हणजे दावोस येथे पहिल्याच दिवशी रेकॉर्डब्रेक पाच लाख कोटींची गुंतवणूक नोंदवून महाराष्ट्र सरकारने विक्रमी ओपनिंग केली आहे. यामुळे भविष्यात मोठ्या रोजगाराच्या संधी उपलब्ध होणार आहेत. याबाबत मंत्री उदय सामंत यांनी माहिती दिली आहे.

**नेमकं काय म्हणाले उदय सामंत?**

दावोस येथे पहिल्याच दिवशी रेकॉर्डब्रेक पाच लाख कोटींची गुंतवणूक नोंदवून महाराष्ट्र सरकारने विक्रमी ओपनिंग केली आहे, असं उदय सामंत यांनी म्हटलं आहे. सोबतच येत्या तीन महिन्यांमध्ये राज्यात मोठा राजकीय भूकंप पाहायला मिळेल, शिवसेना ठाकरे गट आणि काँग्रेसचे अनेक आमदार आणि महत्त्वाचे नेते फुटणार आहेत. ते एकनाथ शिंदे यांचं नेतृत्व स्विकारणार आहेत असा दावा देखील यावेळी उदय सामंत यांनी केला आहे.

आज पुन्हा एकदा दावोसमधून महाराष्ट्राच्या जनतेशी संवाद साधताना आनंद होत आहे. आजचा दिवस हा महाराष्ट्रा मधील गुंतवणुकीसाठी अतिशय महत्त्वाचा आणि आनंदाचा दिवस आहे. मला सांगताना आनंद वाटतो की, आज

### महाराष्ट्रासाठी ३ लाख ८२ हजार कोटींचे सामंजस्य करार

दिवसभरामध्ये राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली सुमारे पाच लाख कोटीपर्यंतची गुंतवणूक आणण्यात यश मिळालं आहे. उद्या देखील अशाप्रकारची गुंतवणूक आणण्यात यश मिळेल. मी जसं महाराष्ट्रातून दावोसला येत असताना सांगितलं होतं. विक्रमी गुंतवणूक महाराष्ट्रात येईल, त्याला आज सुरुवात झाली आहे. महाराष्ट्राच्या जनतेनं आमच्यावर टाकलेला विश्वास महायुतीच सरकार म्हणून आम्ही सार्थ ठरवण्यासाठी प्रयत्न करत आहोत, असं उदय सामंत यांनी म्हटलं आहे. दरम्यान उदय सामंत यांच्यावर शिवसेना ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी आरोप केला होता. फडणवीसांच्या शपथविधीपूर्वीच शिवसेनेत फूट पडणार होती असं त्यांनी म्हटलं होतं. संजय राऊत यांच्या या आरोपाला देखील उदय सामंत यांनी यावेळी उत्तर दिलं आहे. येत्या तीन महिन्यांमध्ये राज्यात मोठा राजकीय भूकंप पाहायला मिळेल, शिवसेना ठाकरे गट आणि काँग्रेसचे अनेक आमदार आणि महत्त्वाचे नेते फुटणार आहेत. ते एकनाथ शिंदे यांचं नेतृत्व स्विकारणार आहेत असं सामंत यांनी म्हटलं आहे.



## आमदार किसन कथोरेंच्या प्रयत्नांना यश

# काचेचा स्कायवॉक दृष्टीक्षेपात

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता * प्रतिनिधी**

मुरबाड : मुरबाड विधानसभेचे कार्यसम्राट आमदार किसन कथोरेंच्या संकल्पनेतील महत्वाकांक्षी प्रकल्प की ज्यामुळे जागतिक पर्यटनाच्या क्षेत्रात मुरबाडचे नाव अधोरेखित होऊन तालुक्यातील पर्यटन आणि पर्यायाने रोजगार वाढिला चालना मिळेल असा माळशेज घाटातील बहुचर्चित काचेचा स्काय वॉक (Viewing Gallary) बांधण्याबाबत आज राज्याचे उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांचे अध्यक्षतेखाली,पर्यटन मंत्री शंभुराज देसाई ,पर्यटन राज्यमंत्री इंद्रनील नाईक ,पर्यटन सचिव जयश्री भोज मॅडम, आमदार किसन कथोरे आणि इतर सर्व संबंधित अधिकारी यांची मंत्रालयात आज बैठक आयोजित करण्यात आली होती.येत्या मार्च २०२५-२६ च्या बजेटमध्ये याबाबत तातडीने प्रस्ताव सादर करून प्रशासकीय मंजुरी आणि निधी उपलब्ध करून देण्यासाठी संबंधितांना सुचना देण्यात आल्यामुळे माळशेज घाटातील काचेचा स्काय वॉक बाबतच्या मुरबाड करांच्या आशा पल्लवित झाल्या आहेत.

# न्या. आलोक आराधे मुंबई उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायमूर्ती

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**मुंबई :** तेलंगणा उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायमूर्ती न्या.आलोक आराधे यांनी आज मुंबई उच्च न्यायालयाच्या मुख्य न्यायमूर्ती पदाची शपथ घेतली. राजभवन येथे मंगळवारी झालेल्या एका छोटेखानी शपथविधी समारंभामध्ये राज्यपाल सी.पी.राधाकृष्णन यांनी न्या. आलोक आराधे यांना पदाची शपथ दिली. शपथ दिल्यानंतर राज्यपालांनी व त्यांच्यानंतर उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे व उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी न्या.आराधे यांचे पुष्पगुच्छ देऊन अभिनंदन केले. या शपथविधी सोहळ्याला उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार, विधानसभेचे



अध्यक्ष राहुल नार्वेकर, कौशल्य विकास मंत्री मंगलप्रभात लोढा तसेच मुंबई उच्च न्यायालयातील न्यायाधीश उपस्थित होते.

कार्यक्रमप्रसंगी सुरुवातीला राज्याच्या मुख्य सचिव सुजाता सौनिक यांनी न्या. आलोक आराधे यांच्या नियुक्तीबाबत केंद्र सरकारची अधिसूचना वाचून दाखवली. शपथविधी सोहळ्याची सुरुवात राष्ट्रगीत व राज्यगीताने झाली आणि राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगता झाली. दरम्यान, न्या. आलोक अराधे यांनी मध्यस्थी व सामंजस्य केंद्रे, न्यायिक अकादमी, तसेच कायदेशीर सेवा प्राधिकरणांमध्ये नेतृत्व केले आहे. त्यांच्या कारकीर्दीत त्यांनी न्यायव्यवस्थेच्या विविध अंगांवर उल्लेखनीय कामगिरी केली आहे. दरम्यान, मुंबई उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायमूर्ती देवेंद्र कुमार उपाध्याय यांची दिल्ली उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायमूर्ती म्हणून बदली करण्यात आली आहे. न्यायमूर्ती उपाध्याय यांनी ऑगस्ट 2023 मध्ये मुंबई उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती म्हणून पदभार स्वीकारला होता, आता सव्वा वर्षाच्या कार्यभारानंतर ते दिल्ली उच्च न्यायालयात पदभार स्वीकारत आहेत.

> विद्यार्थी, विद्यार्थीनींच्या सुरक्षिततेचा विचार करून कल्याण डोंबिवली पालिकेच्या ६१ शाळांमध्ये शासन आदेशाप्रमाणे पालिका प्रशासनाने ५०२ कॅमेरे बसविण्याचा निर्णय घेतला आहे. या निर्णयाची तातडीने अंमलबजावणी केली जात आहे. पुढील महिन्यात फेब्रुवारी अखेरपर्यंत हे काम पूर्ण झालेले असेल. या सीसीटीव्ही कॅमेऱ्यांचे पूर्ण नियंत्रण शाळा व्यवस्थापन समिती, मुख्याध्यपकांवर असणार आहे.
>
> **प्रशांत भागवत**
> **कार्यकारी अभियंता, विद्युत विभाग.**

# महापालिका शाळांवर तिसऱ्या डोळ्याची नजर

## कॅमेऱ्यांची होणार नियमित तपासणी

**शाळांमध्ये सीसीटीव्ही कॅमेरे बसविल्यानंतर या कॅमेऱ्यांचा नियंत्रण कक्ष (मॉनिटर) मुख्याध्यापक यांच्या दालनात असणार आहे. ते दालनात बसून शाळा सुरू झाल्यापासून ते शाळा सुटेपर्यंत शाळेत होत असलेल्या हालचाली या सीसीटीव्ही कॅमेऱ्याच्या माध्यमातून पाहणार आहेत. शाळेतील सीसीटीव्ही चित्रीकरणाची नियमित तपासणी शाळा व्यवस्थापन समिती, मुख्याध्यापक महिला, पुरूष शिक्षक यांच्या उपस्थितीत केली जाणार आहे. सीसीटीव्ही चित्रण तपासताना त्यात काही आक्षेपार्ह आढळून आले तर त्यावर तात्काळ कार्यवाही करण्याची जबाबदारी मुख्याध्यापक, शाळा व्यवस्थापन समितीची असणार आहे. ही माहिती तात्काळ स्थानिक पोलिसांना देण्याची जबाबदारी मुख्याध्यापकांवर सोपविण्यात आली आहे. आठवड्यातून किमान तीन वेळा सीसीटीव्ही चित्रण तपासण्याचे बंधन शाळेवर ठेवण्यात आले आहे. आपण सीसीटीव्ही कॅमेऱ्यांच्या निगराणीखाली आहोत याची जाणीव विद्यार्थ्यांना शिक्षकांकडून करून देण्यात येणार आहे. यामुळे प्रत्येक विद्यार्थ्यात एक स्वयंशिस्त निर्माण होण्यात यामुळे साहाय्य होईल, असे कार्यकारी अभियंता भागवत यांनी सांगितले.**

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

कल्याण : विद्यार्थ्यांची सुरक्षितता, शाळेतील गैरकृत्य रोखणे, शाळेची सुरक्षितता या सर्व बाबींचा विचार करून कल्याण डोंबिवली पालिका प्रशासनाने पालिकेच्या कल्याण, डोंबिवली शहरातील ६१ शाळांमध्ये सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्याचा निर्णय घेतला आहे. हे काम तातडीने सुरू करण्यात आले आहे, अशी माहिती कल्याण डोंबिवली पालिकेच्या विद्युत विभागाचे कार्यकारी अभियंता प्रशांत भागवत यांनी दिली. बदलापूर येथील एका शाळेत मागील वर्षी दोन बालिकांवर लैंगिक अत्याचाराची घटना शाळेतील सेवकाकडून झाल्यानंतर या प्रकाराने राज्य हादरले होते. या गैरकृत्याविषयी सर्व स्तरांतून तीव्र संताप व्यक्त केला जात होता. शासनाने या प्रकरणाची गेल्या वर्षी ऑगस्टमध्ये गंभीर दखल घेऊन राज्यातील सर्व शासकीय, खासगी, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळामध्ये सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्याचे आदेश शाळा नियंत्रक संस्था, प्रशासनांना दिले होते.

या आदेशाप्रमाणे कल्याण डोंबिवली पालिकेच्या आयुक्त डॉ. इंदुराणी जाखड यांनी पालिका हद्दीतील पालिकेच्या सर्व शाळांमध्ये सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्याचे आदेश दिले. या आदेशाप्रमाणे पालिकेच्या विद्युत विभागाचे कार्यकारी अभियंता प्रशांत भागवत यांनी सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्याच्या आवश्यक प्रशासकीय मंजुऱ्या, निधीची मंजुरी प्राप्त झाल्यानंतर कल्याण डोंबिवली पालिकेच्या शाळांमध्ये सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्याचे काम सुरू केले आहे.

# भिवंडीला 'बीड' बनवायचंय का?

## खासदार बाळ्या मामांचा संतप्त सवाल

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**
**प्रतिनिधी**

भिवंडी : भिवंडीतील तडीपार गुंड सुजित मधुकर पाटीलला 2017 मध्ये मकोका लावण्यात आला आणि 2022 मध्ये त्याची जामिनावर सुटका झालीय. दरम्यान त्यानंतर देखील त्याने सहा गुन्हे केले आहेत. 13 जून पासून तो तडीपार असल्याचा नारपोली पोलीस स्टेशनने सांगितलंय. असे असताना देखील त्याने 307चा गुन्हा केला असा पोलीस ठाण्यात नोंद आहे. तसेच तो जाहीरपणे कार्यक्रमात वावरतो, मात्र पोलीस त्याला अटक करत नाही आणि त्यामुळे लोकांमध्ये भीतीचं वातावरण आहे. तो लोकांमध्ये बोलतो की मोठ्या एक ते दोन लोकांची हत्या करणार आहे. त्यामुळे प्रशासनाला प्रश्न आहे की बीड आणि परभणी सारख्या हत्याकांडाची वाट तुम्ही बघत आहात का? भिवंडीला परभणी आणि बीड बनवायचे आहे का? असा सवाल उपस्थित करत खासदार सुरेश म्हात्रे (Suresh Mhatre) उर्फ बाळ्या मामा यांनी पोलिसांच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे. दरम्यान, जर या प्रकरणात लवकरात लवकर कारवाई झाली नाही तर मोठे जन आंदोलन करण्यात येईल, असा इशाराही सुरेश म्हात्रे (Suresh Mhatre) यांनी दिला आहे.

**मनोज म्हात्रे हत्या प्रकरणाची पुन्हा चौकशीची मागणी**

दरम्यान, पुढे बोलताना सुरेश म्हात्रे यांनी मनोज म्हात्रे हत्या प्रकरणाची पुन्हा चौकशीची मागणीही केली आहे. भिवंडी महानगरपालिकेतील तत्कालीन काँग्रेस विरोधी पक्ष नेते मनोज म्हात्रे यांच्या 14 फेब्रुवारी 2017 रोजी झालेल्या निर्घृण हत्येची पुन्हा चौकशी करण्यात यावी. हत्याकांडातील प्रमुख आरोपींनी 193 वेळा सुमित पाटील यांच्याशी संपर्क साधल्याने त्याचे कॉल डिटेल रेकॉर्ड (सीडीआर) काढण्याची मागणी ही त्यांनी यावेळी केली आहे. तसेच या प्रकरणात माजी केंद्रीय मंत्री कपिल पाटील आणि सुमित पाटील यांचा संबंध असल्याचा दावा ही खासदार सुरेश म्हात्रे यांनी केला आहे. या गंभीर आरोपांच्या पार्श्वभूमीवर हत्याकांडाची सखोल चौकशी करण्याची मागणी त्यांनी केलीय.

### बुलेट ट्रेन प्रोजेक्टमध्ये होतोय मोठा भ्रष्टाचार - सुरेश म्हात्रे

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा ड्रीम प्रोजेक्ट असलेल्या बुलेट ट्रेन मध्ये शेकडो कोटी रुपयांचा भ्रष्टाचार होत असल्याचा आरोप खासदार सुरेश म्हात्रे उर्फ बाळ्या मामा यांनी केला आहे. 2012च्या करारात 2015चा स्टॅम्प पेपर आणि 2018चा फोटो वापरल्याचे म्हात्रे यांनी सांगितलंय. तर MMRDA ने परवानगी नाकारली असून कोर्टाने या बांधकामाला बेकायदेशीर ठरवत स्टे दिला आहे. सुमित पुरुषोत्तम पाटील, देवेश पुरुषोत्तम पाटील आणि सिद्धेश कपिल पाटील यांना 20 कोटी 12 लाख मोबदला देण्यात आला होता. मात्र, 6 जून 2024 रोजी फेरमूल्यांकन करून पुन्हा 196 कोटींचा प्रस्ताव शासनाला सादर करण्यात आला आहे. त्यामुळे या बुलेट ट्रेन प्रोजेक्टमध्ये मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार होत असल्याचा आरोप खासदार सुरेश म्हात्रे यांनी केला आहे.



# गीतासार



मूळ पहिल्या अध्यायाची समाप्ती

ॐ तत्सदिति श्रीमद्भगवद् गीतासूपनिषत्सु ब्रह्मविद्यायां योगशास्त्रे श्रीकृष्णार्जुनसंवादे अर्जुनविषादयोगो नाम प्रथमोऽध्यायः । १ ।

**अर्थ**

ॐ हे परमसत्य आहे. याप्रमाणे श्रीमद्भगवद्गीतारूपी उपनिषद तथा ब्रह्मविद्या आणि योगशास्त्राविषयी श्रीकृष्ण आणि अर्जुन यांच्या संवादातील अर्जुनविषादयोग नावाचा हा पहिला अध्याय समाप्त झाला. । १ ।

**आरोग्य टिप्स**

## कॉर्न रॅब आरोग्य आणि चवीचा खजिना



कॉर्न रॅब पिण्याचे आश्चर्यकारक फायदे

रोगप्रतिकारक शक्ती वाढवते: मक्यामध्ये झिंक आणि अनेक जीवनसत्त्वे असतात जी रोगांशी लढण्यास मदत करतात. हिवाळ्यात कॉर्न रॅब प्यायल्याने तुमची रोगप्रतिकारक शक्ती मजबूत होते आणि सर्दी, खोकला आणि फ्लू सारख्या समस्या कमी होतात.

ऊर्जा वाढ: हिवाळ्यात थकवा आणि अशक्तपणा अनेकदा जाणवतो. कॉर्नमध्ये कार्बोहायड्रेट्स असतात जे उर्जेची पातळी वाढविण्यास मदत करतात.

पचनक्रिया निरोगी राहते: कॉर्नमध्ये भरपूर फायबर असते जे पचनक्रिया सुधारण्यास मदत करते. यामुळे बद्धकोष्ठता आणि अपचन यासारख्या समस्या दूर होतात.

त्वचेसाठी फायदेशीर: कॉर्नमध्ये अँटीऑक्सिडंट्स असतात जे त्वचा निरोगी ठेवण्यास मदत करतात. यामुळे त्वचा मऊ आणि चमकदार होते.

हाडे मजबूत करते: कॉर्नमध्ये कॅल्शियम असते जे हाडे मजबूत करण्यास मदत करते.

कॉर्न रॅब बनवण्याची सोपी रेसिपी

साहित्य:

कॉर्न चे दाणे - 1 कप
दूध - 2 कप
साखर - चवीनुसार
तूप - 1 टीस्पून
वेलची पावडर - एक चिमूटभर

पद्धत:

मक्याचे दाणे धुवून 2-3 तास पाण्यात भिजत ठेवा.
एका पॅनमध्ये तूप गरम करा, त्यात भिजवलेले कॉर्न घाला आणि सोनेरी तपकिरी होईपर्यंत परतून घ्या.
त्यात दूध घाला आणि उकळी येऊ द्या.
अर्धे दूध शिल्लक राहिल्यावर साखर आणि वेलची पावडर घाला आणि चांगले मिसळा.
गॅस बंद करा आणि गरमागरम कॉर्न रॅब सर्व्ह करा.

# कोल्हापूरी भडंग



भडंग बनवण्यासाठी लागणारे साहित्य

कुरमुरे, पाव किलो शेंगदाणे,कडीपत्ता,लसूण,तिखट मसाला,हळद,मिठ,तेल

कसा बनवायचा कोल्हापूरी स्टाईल भडंग? - दुकानातून १० ते १५ रूपयांचे कुरमुरे विकत आणा.

एका कढईत तेल घ्या आणि त्यात पाव किलो शेंगदाणे भाजून घ्या. नंतर त्यात कडीपत्ता (१० ते १५ पाने) टाका.लसूण, तिखट मसाला, हळद, मिठ मिक्सरमध्ये जाडसर बारिक करून घ्या. (टीप – लसूण सालीसह टाका). नंतर हे मिश्रण तेलात टाका. परतवून घ्या आणि मग त्यात कुरमुरे घाला.अशाप्रकारे तुमचा ‘कोल्हापूरी स्पेशल भडंग’ तयार होतो.

# केस अकाली पांढरे का होतात ?



केस अकाली पांढरे होणे ही आजकाल एक सामान्य समस्या बनली आहे. वयानुसार केस पांढरे होणे स्वाभाविक आहे, परंतु जर ते अकाली होत असतील तर त्याला तुमच्या जीवनशैलीतील काही सवयी कारणीभूत असू शकतात. चला जाणून घेऊया अशा सवयी ज्यामुळे तुमचे केस अकाली पांढरे होऊ शकतात.

ताण - तणावामुळे केवळ मानसिक आरोग्यावरच परिणाम होत नाहीत तर केसांना रंग देणाऱ्या पेशींसह शरीरातील निरोगी पेशींचेही नुकसान होते. दीर्घकाळ तणावामुळे केस अकाली पांढरे होऊ शकतात.

खराब झोप - अपुरी झोप केसांच्या आरोग्याशी संबंधित प्रक्रियांसह शरीराची कार्ये विस्कळीत करू शकते. पुरेशी झोप न मिळाल्याने केस कमकुवत आणि निर्जीव होऊ शकतात.

पौष्टिक कमतरता - B12, D3, कॅल्शियम, तांबे, लोह आणि जस्त यांसारख्या जीवनसत्त्वे आणि खनिजांची कमतरता हे केस अकाली पांढरे होण्याचे प्रमुख कारण असू शकते. योग्य आहार न घेतल्याने केसांना आवश्यक पोषण मिळत नाही.

धुम्रपान - धुम्रपान केल्याने केसांचा रंग आणि पोत खराब होऊ शकतो. हे केसांच्या कूपांचे नुकसान करते, ज्यामुळे केस अकाली राखाडी आणि कमकुवत होतात.

अति मद्य सेवन - अल्कोहोलच्या अतिसेवनामुळे शरीरातील पोषक तत्वे निघून जातात आणि पोषक तत्वांचे शोषण होण्यास अडथळा निर्माण होतो. याचा केसांच्या आरोग्यावर विपरीत परिणाम होतो.

पर्यावरणीय विष - प्रदूषण आणि हानिकारक रसायनांच्या संपर्कात आल्याने केसांच्या मुळांना हानी पोहोचते आणि मेलेनिन उत्पादनात व्यत्यय येऊ शकतो, ज्यामुळे केस पांढरे होतात.

शारीरिक हालचालींचा अभाव नियमित व्यायाम न केल्यामुळे शरीरात रक्ताभिसरण नीट होत नाही, त्यामुळे पोषक तत्व केसांच्या मुळांपर्यंत पोहोचत नाहीत. त्यामुळे केस कमकुवत होऊन लवकर पांढरे होतात.

प्रो-इंफ्लॅमेटरी आहार - जास्त साखर, प्रक्रिया केलेले पदार्थ आणि संतृप्त चरबीयुक्त आहार शरीरात जळजळ वाढवू शकतो. या जळजळामुळे केसांच्या पेशींचे नुकसान होऊ शकते आणि केस पांढरे होऊ शकतात.

# महाराष्ट्र राज्य राष्ट्रीय वीज कामगार फेडरेशनच्या अध्यक्षपदी भाई जगताप

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता
कल्याण(प्रतिनिधी) :

वीज क्षेत्रात सर्वात जुन्या असणाऱ्या कॉंग्रेस प्रणित म. रा. राष्ट्रीय वीज कामगार फेडरेशन, इंटक या संघटनेच्या अध्यक्षपदी कामगार नेते भाई जगताप यांची दामोधर चंगोले यांनी सुचना मांडली व सर्व इंटक सभासदांच्या अनुमोदनाने बहुमताने फेरनिवड करण्यात आली. ग दि माडगूळकर नाट्यगृह, निगडी, प्राधीकरण येथे संघटनेचे एक दिवसीय अधिवेशन भरविण्यात आले होते यावेळी एकमताने हा ठराव घेण्यात आला.





या अधिवेशनात कामगारांच्या विविध प्रलंबीत प्रश्नांवर सविस्तर चर्चा करण्यात येऊन ठराव घेण्यात आले. यावेळी केंद्र व राज्य सरकारच्या भांडवलशाही धोरणावर कडाडून टीका करण्याला आली. सरकार उठसूट अदाणीची भलावण करीत आहे व जनकल्याण पेक्षा अदाणीचे उदात्तीकरण करीत आहे. त्याचाच एक भाग म्हणून सध्या प्रिपेड मीटर वीज ग्राहकांना लावण्यात येत आहेता याला प्रस्तुत संघटनेने कडाडून विरोध केला आहे. वीज कर्मचाऱ्यांना जुनी पेन्शन योजना लागू करा, तसेच जलविद्युत प्रकल्प शासकीय निर्मिती कंपनीलाच देण्यात यावीत, तिनही वीज कंपन्यांतील रिक्त जागा अनुशेषासह भरण्यात याव्यात, बाह्यस्रोत कर्मचाऱ्यांना कायम करा, वीज कंपन्यात भविष्य निर्वाह निधी ट्रस्टमधील घोटाळयाची व महावितरण भ्रष्टाचाऱ्यांची चौकशी करण्यात यावी, उपकेंद्रांची व ग्राहक संख्येच्या प्रमाणात आणखी कार्यालये उघडण्यात यावीत, अग्निशमन दलातील कर्मचारी, अधिकाऱ्यांना तांत्रिकचा दर्जा देण्यात येऊन त्यांचे अपग्रेडेशन करण्यात यावे इत्यादी मागण्या करण्यात आल्या.

# महावितरण कर्मचाऱ्याला मारहाण

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता
उल्हासनगर(प्रतिनिधी) :

थकित वीज बिलाच्या वसुलीसाठी गेलेल्या महावितरण कर्मचाऱ्याला मारहाणीचा सामना करावा लागल्याची घटना उल्हासनगरात घडली आहे. एका ग्राहकाने कर्मचाऱ्यावर हात उचलल्याने संपूर्ण परिसरात खळबळ उडाली आहे. विशेष म्हणजे, ही मारहाणीची घटना मोबाईल कॅमेऱ्यात कैद झाली आहे. संबंधित प्रकरणी विठ्ठलवाडी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून, पोलिसांकडून आरोपीचा शोध सुरू आहे.

उल्हासनगरातील कॅम्प क्रमांक ४ च्या वसीटा कॉलनीत राहणारा रोशन रहेजा याचे मागील दोन महिन्यांपासून १८ हजार रुपयांचे वीज बिल थकले होते. बिलाच्या वसुलीसाठी महावितरणचे कर्मचारी इलमुदिन मैबूब शेख हे त्यांच्या घरी पोहोचले. वीज बिल भरण्यासाठी दबाव टाकल्यावर शेख आणि रहेजामध्ये वाद झाला. वाद विकोपाला गेल्यानंतर रहेजाने महावितरण कर्मचाऱ्याला मारहाण केली. घटनास्थळी उपस्थित काहींनी हा सर्व प्रकार मोबाईल कॅमेऱ्यात कैद केला. या व्हिडीओत मारहाणीचा थरार स्पष्टपणे दिसत आहे. महावितरण कर्मचाऱ्याने दिलेल्या तक्रारीनंतर विठ्ठलवाडी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी घटनास्थळाचा तपास करून व्हिडीओच्या आधारे आरोपी विरोधात कठोर कारवाई करण्याचे आश्वासन दिले आहे.

या घटनेनंतर उल्हासनगरकरांमध्ये संताप व्यक्त केला जात आहे. “महावितरण कर्मचारी फक्त आपले काम करत होते, त्यांना अशा प्रकारे मारहाण करणे अयोग्य आहे,” असे काही स्थानिकांचे म्हणणे आहे. तर काहींनी ग्राहकाच्या गैरवर्तनावर टीका करत, "थकित बिल भरण्याऐवजी हिंसाचार करणे पूर्णतः चुकीचे आहे," असे सांगितले. थकित वीज बिल वसुलीसाठी गेलेल्या कर्मचाऱ्याला मारहाणीचा सामना करावा लागणे हे गंभीर आहे. या घटनेने महावितरण कर्मचाऱ्यांच्या सुरक्षेचा मुद्दा ऐरणीवर आला असून, भविष्यात अशा घटनांना आळा घालण्यासाठी कठोर उपाययोजना करणे गरजेचे आहे.

# ‘प्रयागराज’च्या नावाचा अर्थ

कुंभमेळा हा जगातील सर्वात मोठा धार्मिक मेळा मानला जातो. महाकुंभमेळा हा हिंदू कॅलेंडरमधील एक महत्त्वाचा कार्यक्रम आहे, जो दर १२ वर्षांनी प्रयागराज येथे आयोजित केला जातो. जिथे गंगा, यमुना आणि पौराणिक सरस्वती नद्या एकत्र येतात. हा मेळा १३ जानेवारीपासून सुरू झाला असून २६ फेब्रुवारीपर्यंत सुरू राहणार आहे. १४४ वर्षांनंतर होणाऱ्या दुर्मीळ ग्रहस्थितीमुळे या कुंभमेळ्याला आगळे महत्त्व प्राप्त झाले आहे. जगातील सर्वात मोठ्या धार्मिक मेळाव्याचे प्रतीक असलेल्या महाकुंभ २०२५ साठी आतापर्यंत सुमारे सात कोटी भाविक जमले आहेत.

प्रयागराज हे भारतातील सर्वात महत्त्वाच्या तीर्थक्षेत्रांपैकी एक आहे. प्रयागराज ही नद्यांच्या तसेच संस्कृतींच्या संगमाची भूमी आहे, ज्याला कधी इलावर्त, कधी इलाबास असे म्हटले जात असे. हे इलावास या नावाचा अपभ्रंश होत नंतर ते इलाहवास झाले आणि नंतर



अलाहाबादमध्ये झाले आणि त्याला अलाहाबाद असेही म्हटले जाऊ लागले. टाईम्स नाऊ’ या यूट्यूब चॅनेलच्या व्हिडीओमध्ये दिलेल्या माहितीनुसार, “वेदांच्या अस्तित्वापूर्वीही, प्रयागराजमध्ये महाकुंभमेळा साजरा केला जात असे.” व्हिडीओमध्ये पुढे स्पष्ट केले आहे की, “‘प्र’ या शब्दाचा अर्थ ‘प्रथम’ (पहिला) आणि ‘याग’ म्हणजे ‘यज्ञ’ असा होतो. भगवान ब्रह्मदेवाने अक्षय वट जवळ विश्वातील पहिला यज्ञ केला होता आणि त्या ठिकाणाचे नाव प्रयाग पडले. कालांतराने संपूर्ण परिसर प्रयागराज म्हणून ओळखला जाऊ लागला.” महाकुंभ मेळा मोक्ष (मुक्ती) मिळवण्याकरिता संगमावर पवित्र स्नान करण्यासाठी लाखो हजारो भाविक हजेरी लावत आहेत. जगातील सर्वात मोठ्या मानवी मेळाव्याच्या आध्यात्मिक उत्साहात मोठ्या संख्येने आंतरराष्ट्रीय पर्यटकदेखील सहभागी झाले आहेत. पौष पौर्णिमेच्या शाही स्नानाने सोमवारी (१३ जानेवारी) सुरू झालेल्या महाकुंभमेळ्यामुळे गंगा, यमुना आणि पौराणिक सरस्वती नद्यांच्या संगमाचे रूपांतर श्रद्धा, संस्कृती आणि मानवतेच्या चैतन्यशील स्थानामध्ये केले आहे. दर १४४ वर्षांनी एकदा होणाऱ्या या दुर्मीळ संयोगामुळे जगभरातील लोकांनी येथे भेट दिली आहे.

२६ फेब्रुवारीपर्यंत सुरू असलेल्या महाकुंभमेळ्यात ४०-४५ कोटी पर्यटक मोठ्या संख्येने येण्याची तयारी उत्तर प्रदेश सरकार करत आहे. सर्वकाही सुरळीत पार पडावे यासाठी अधिकाऱ्यांनी मोठ्या प्रमाणात संसाधने एकत्रित केली आहेत.

# हृदयरोग्यांसाठी फायदेशीर योगासने

योग ही एक प्राचीन भारतीय प्रथा आहे जी शरीर आणि मन निरोगी ठेवण्यास मदत करते. परंतु, हृदयरोग्यांनी काही योगासने करणे टाळावे, कारण ते त्यांच्या आरोग्यासाठी हानिकारक असू शकतात. हृदयरोग्यांनी खालील योगासने करू नयेत....

1. शीर्षासन -या आसनात डोके खाली आणि पाय वरच्या दिशेने असतात. या आसनामुळे रक्तदाब वाढू /0258शकतो, जो हृदयरोग्यांसाठी धोकादायक ठरू शकतो.

2. हलासन (नांगराची मुद्रा): या आसनात शरीर नांगराच्या आकारात वाकलेले असते. या आसनामुळे रक्तदाबही वाढू शकतो.

3. करणपदासन (ससा पोझ): या आसनात शरीर सशाच्या आकारात वाकलेले असते. या आसनामुळे पाठीच्या कण्यावर दाब पडू शकतो, जो हृदयरोग्यांसाठी धोकादायक ठरू शकतो.

4. सेतुबंधासन (ब्रिज पोझ): या आसनात शरीर पुलाच्या आकारात वाकलेले असते. या आसनामुळे हृदयाची गती वाढू शकते, जी हृदयरोग्यांसाठी धोकादायक ठरू शकते.

5. उष्ट्रासन (उंटाची मुद्रा): या आसनात शरीर उंटाच्या आकारात वाकलेले असते. या आसनामुळे हृदयावर दाब पडू शकतो, जो हृदयरोग्यांसाठी धोकादायक ठरू शकतो.

या योगासनांच्या व्यतिरिक्त, हृदयाच्या रुग्णांनी ती सर्व योगासने टाळली पाहिजेत ज्यांना शरीराला जास्त वळण किंवा वाकणे आवश्यक आहे. याव्यतिरिक्त, त्यांनी अशी योगासने टाळली पाहिजेत ज्यामुळे श्वास घेण्यास त्रास होतो.

जर तुम्ही हृदयाचे रुग्ण असाल आणि तुम्हाला योगा करायचा असेल तर आधी तुमच्या डॉक्टरांचा सल्ला नक्की घ्या. ते तुम्हाला सांगू शकतात की कोणती योगासने तुमच्यासाठी सुरक्षित आहेत आणि कोणती नाहीत.

हृदयाच्या आरोग्यासाठी योगासने
हृदयरोग्यांसाठी सुरक्षित योग

हृदयरोग्यांसाठी अनेक सुरक्षित योगासने आहेत ज्यांचा ते सराव करू शकतात. या योगासनांमध्ये हे समाविष्ट आहे:

1. शवासन (शव आसन): या आसनात शरीराला जमिनीवर सरळ झोपवले जाते. हे आसन शरीराला आराम आणि तणाव कमी करण्यास मदत करते.

2. बालासन (मुलाची मुद्रा): या आसनात शरीर मुलाच्या आकारात वाकलेले असते. या आसनामुळे शरीराला आराम मिळतो आणि पाठीचा कणा लवचिक होतो.

3. अधोमुख श्वानासन: या आसनात शरीर उलट्या V च्या आकारात वाकलेले असते. या आसनामुळे शरीर मजबूत होण्यास आणि रक्ताभिसरण सुधारण्यास मदत होते.

4. त्रिकोनासन (त्रिकोण मुद्रा): या आसनात शरीर त्रिकोणाच्या आकारात वाकलेले असते. हे आसन शरीर लवचिक बनवण्यास आणि तणाव कमी करण्यास मदत करते.

5. वीरभद्रासन (योद्धा मुद्रा): या आसनात शरीर योद्धाच्या आकारात वाकलेले असते. या आसनामुळे शरीर मजबूत होण्यास आणि संतुलन सुधारण्यास मदत होते.

या योगासनांचा सराव करण्यापूर्वी तुमच्या डॉक्टरांचा सल्ला नक्की घ्या. या योगासनांचा तुम्ही किती वेळ आणि किती वेळा सराव करू शकता हे ते तुम्हाला सांगू शकतात.

हृदयरोग्यांनी योगाभ्यास करताना काही खबरदारी घ्यावी...
योगाभ्यास करताना हळूहळू श्वास घ्या.
जर तुम्हाला काही वेदना किंवा अस्वस्थता जाणवत असेल तर ताबडतोब योगाभ्यास करणे थांबवा.
योगाभ्यास केल्यानंतर काही वेळ विश्रांती घ्यावी.
ही खबरदारी घेतल्यास, हृदयरोगी सुरक्षितपणे योगाभ्यास करू शकतात आणि त्याचे अनेक फायदे मिळवू शकतात.



# संविधान गौरव अभियानासंदर्भात भाजपाची बैठक

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता
कल्याण(प्रतिनिधी) : :

भारतीय जनता पार्टीचे संविधान गौरव अभियान पूर्ण देशभर चालू असून राज्यभर या संविधान गौरव अभियानास उदंड प्रतिसाद मिळत आहे. भारतीय जनता पार्टी हीच संविधानाची खरी सन्मान करणारी पार्टी आहे. हेही सर्वसामान्य नागरिकांच्या लक्षात आले असल्याची माहिती महाराष्ट्र प्रदेशाचे अनुसूचित जाती मोर्चाचे सरचिटणीस व संविधान गौरव अभियानाचे राज्याचे सहसंयोजक शशिकांत कांबळे यांनी दिली.




संविधान गौरव अभियान संदर्भात सोमवारी महाराष्ट्र प्रदेश भारतीय जनता पार्टीचे कार्यालयामध्ये महाराष्ट्रातील प्रमुख पदाधिकाऱ्यांची बैठक घेण्यात आली. या बैठकीला माजी मंत्री दिलीप कांबळे, माजी मंत्री भाई गिरकर तसेच राज्याच्या सरचिटणीस माधवी नाईक यांनी या बैठकीला मार्गदर्शन केले, यावेळी शशिकांत कांबळे बोलत होते. या बैठकीला माधवी नाईक, माजी मंत्री दिलीप कांबळे, माजी मंत्री भाई गिरकर, धम्मपाल मेश्राम, शशिकांत कांबळे, पंडित सूर्यवंशी, दिनेश पगारे, डॉक्टर मिलिंद माने, तेजस निर्भवणे, धनराज बिर्दा, सुरेश गायकवाड, अशोक उमर्गेकर यासह अन्य महत्वाचे पदाधिकारी उपस्थित होते. या अभियानाचे संयोजक राष्ट्रीय सरचिटणीस विनोद तावडे आहेत. महाराष्ट्र मध्ये राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे तर कार्यकारी अध्यक्ष रवींद्र चव्हाण यांच्या मार्गदर्शनामध्ये राज्यभर संविधान गौरव अभियान चालू आहे. राज्याचे संयोजक आमदार अमित गोरखे आहेत. पूर्ण राज्यभर संविधान गौरव अभियानाचे कार्यक्रम राबविले जात असून हे अभियान 26 तारखेपर्यंत राबवायचे आहे.

सर्व जिल्ह्यांमध्ये एक जाहीर सभा तसेच वेगवेगळया कॉलेजमध्ये शाळांमध्ये झोपडपट्ट्यांमध्ये संविधानाच्या विषयात अभियान राबवली जात असून या महाराष्ट्रामध्ये राष्ट्रीय नेत्यांच्या सुद्धा संविधान गौरव अभियानाचे विषयात सभा आयोजित केलेले आहेत. 16 तारखेला ज्योतिरादित्य शिंदे यांची पुणे येथे सभा झाली असून महाराष्ट्र मध्ये अमित शहा, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, नितीन गडकरी, लालसिंग आर्या अशा अनेक मान्यवरांच्या सभा या महाराष्ट्र प्रदेशामध्ये होणार आहेत. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या संविधानाचा नेहमीच देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी, अमित शहा तसेच भारतीय जनता पार्टीच्या सर्वच कार्यकर्त्यांनी सन्मान केलेला आहे. काँग्रेसने डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना दोन वेळा लोकसभेत जाण्यापासून रोखले त्यांना निवडणुकीत पराभूत केले हे सर्व जनतेला माहित असल्याचे शशिकांत कांबळे यांनी सांगितले.

# उल्हासनगर मनपा आयुक्तांची विकास कामांची पाहणी



**दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता/ उल्हासनगर(प्रतिनिधी) :**
मा. प्रशासक तथा आयुक्त मॅडम यांनी एम.एम.आर.डी.ए. द्वारे सुरु असलेल्या 07 रस्त्यांची, गोल मैदान येथील प्रस्तावीत क्रिडा संकुल व व्हि.टी.सी. ग्राउंड येथील हॉ. बाहासाहेब ठाकरे मेमोरीयल क्रिडा संकुलाची व मनपा कार्यक्षेत्रातील विविध ठिकाणी पाहणी केली.
1. उल्हासनगर -04 येथील नेताजी चौक ते कैलास कॉलनी, कुर्ला कॅम्प मार्गे येथे सिमेंट कॉंक्रिट रोड बनविणे.
2. उल्हासनगर -05 येथील न्यू इंग्लिश हाई स्कूल ते लालचक्की, पेट्रोलपंप आणि हील लाईन पोलिस स्टेशन मार्गे येथे सिमेंट कॉंक्रिट रोड बनविणे.
3.उल्हासनगर ०१, येथील ए - ब्लॉक ते साईबाबा मंदिर, डॉल्फिन क्लब आणि सेंच्युरी ग्राउंड मार्गे येथे सिमेंट कॉंक्रिट रोड बनविणे.
4. उल्हासनगर -04 येथील सोनार चौक ते कोयांडे, शारदा कॅस्टल मार्गे येथे सिमेंट कॉंक्रिट रोड बनविणे.
5. उल्हासनगर -0३ येथील हिरा घाट मंदिर ते डर्बी हॉटेल, समर्पण अपार्टमेंट मार्गे येथे सिमेंट कॉंक्रिट रोड बनविणे.
6.उल्हासनगर -03 येथील शामा प्रसाद मुखर्जी चौक ते शांतीनगर, विठ्ठलवाडी रेल्वे स्टेशन मार्गे येथे सिमेंट कॉंक्रिट रोड बनविणे.
7. उल्हासनगर -04 येथील वॉक्को कंपाऊंड ते विनस चौक वी. टी. सी. ग्राउंड मार्गे येथे सिमेंट कॉंक्रिट रोड बनविणे.

सदर ठिकाणी पाहणी करतेवेळी अति. आयुक्त किशोर गवस, शहर अभियंता (साबांवि) तरुण सेवकानी, कार्यकारी अभियंता, (पापुवि) श्री. परमेश्वर बुडगे, कनिष्ट अभियंता श्री. हर्षद प्रधान, (साबांवि), तसेच जनंसपर्क अधिकारी श्रीम. छाया डांगळे आणि इतर अधिकारी कर्मचारी उपस्थित होते.
*सदर पाहणीअंती मा. प्रशासक तथा आयुक्त महोदया यांनी खालील प्रमाणे निर्देश दिले आहेआहेत
1.उल्हासनगर 1, गोल मैदान येथील प्रस्तावित कामाचे प्रकल्प नकाशे व संपूर्ण कामाचे उमपा नियुक्त सलागार यांच्या द्वारे सादरीकरण करावे.-CE(pwd)
2. एम.एम.आर.डी.ए. द्वारे सुरु असलेल्या 07 रस्त्यांची कामे जलद गतीने होण्याकरिता एमएमआरडीए वर अवलंबून न राहता त्यांचे कडून होत असलेल्या सदर कामाच्या भौतिक प्रगतीची CE (pwd), EE (पापु ) यांनी दैनंदिन पाहणी करावी. स्थळ पाहणीचे फोटो काढून आपापल्या व्हाट्सअप ग्रुप वर पाठवावेत.महानगरपालिकेच्या कामामुळे(उदा.road marking मधील अतिक्रमण हटवणे, झाडे कापणे, ड्रेनेज पाईप्स, इत्यादी अनुषंगिक कामे) MMRDA चे काम थांबले असेल तर ते संबंधित अधिकाऱ्यांनी त्वरित पुर्ण करावे. नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी MMRDA प्राधिकरणाकडून रस्त्यांचे व्यवस्थीतरित्या बेरेकेटीग करणे, व सुरु असलेल्या कामाच्या ठिकाणी कामाचे नाव, संबंधीत विभाग, कामाची प्राकलनीय रक्कम, ठेकेदाराच्या नाव, संपर्क क्र. दर्शविणारे फळक लावणे इत्यादी कामे त्वरित पूर्ण करावीत. अतिरिक्त आयुक्त यांनी वरील सर्व बाबींवर देखरेख ,नियंत्रण करून सर्व कामे लवकरात लवकर होईल हे पहावे.
3.एम.एम.आर.डी.ए. अधिकारी संबंधीत ठेकेदारसह उमपा मुख्यालयात संयुक्त बैठक गुरुवारी आयोजित करावी.
4.संबंधीत प्रभाग अधिकारी (सहाय्यक आयुक्त) यांनी वाहतूक पोलिसांची संपर्क साधून रस्त्यावर अनधिकृतरित्या उभ्या करण्यात आलेल्या वाहनांवर, अनधिकृत फेरीवाल्यांवर त्वरित कारवाई करावी. कारवाई मध्ये सातत्य ठेवावे.
5)उल्हासनगर 4, व्ही.टी.सी. ग्राउंड येथील हॉ. बाळासाहेब ठाकरे मेमोरियल क्रिडा संकुल या प्रकल्पाचे काम बंद असल्याने संबंधित ठेकेदारास नोटीस बजावण्यात यावी-CE(pwd)
6) पाहणी दरम्यान १) गोल मैदान परिसर २) व्ही. टी. सी. ग्राउंड रोड ३) स्वर्गद्वार स्मशानभूमी या ठिकाणी कचरा दिसून आल्यामुळे संबंधित स्वच्छ्ता निरीक्षक ह्यांना नोटीस बजाविण्यात आल्या आहेत. शहरात दैनंदिन साफसफाई/ स्वच्छतेची कामे झाली नाहीत तर शिस्तभंगाची कारवाई करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

# सर्दी, खोकल्याचे रुग्ण जिल्हा रुग्णालयात सर्वाधिक

**दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता/ ठाणे(प्रतिनिधी) :**
जिल्हा रुग्णालयात गेल्या वर्षभरात ओपीडीमध्ये ११ लाख चार हजार ६१३ जणांवर उपचार केले. यात सर्वाधिक रुग्ण हे डोळ्यांच्या विभागात झाले असून याठिकाणी १७ हजार ५६७ रुग्णांवर उपचार करण्यात आले. त्यातही सर्दी, खोकल्याचे रुग्ण येथील ओपीडीत अधिक होते.




जिल्ह्याच्या विविध भागांतून रुग्ण ठाणे जिल्हा रुग्णालयात ठाण्यासह जिल्ह्याच्या विविध भागांतून रुग्ण येतात. त्यातही मागील वर्षभरात सर्दी, खोकल्याच्या रुग्णांमध्ये देखील वाढ झाल्याचे दिसून आले. या रुग्णांवरही योग्य प्रकारे उपचार करण्यात आल्याचे प्रशासनाच्या वतीने सांगण्यात आले.

> जिल्ह्याच्या विविध भागांतून येणाऱ्या गोरगरीब रुग्णांवर उपचार केले जातात. मागील वर्षभरात सर्दी, खोकल्याचेही रुग्ण वाढले आहेत. मात्र, अशा रुग्णांनी वेळेत उपचार घेतल्यास पुढील धोका टळतो.
> -डॉ. कैलास पवार,
> जिल्हा शल्यचिकित्सक, ठाणे.

# ठाण्यात रंगला मराठी भाषेचा सोहळा

**दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता/ ठाणे(प्रतिनिधी) :**
ठाणे पालिकेतर्फे मराठी भाषा संवर्धन पंधरवड्यानिमित्त सोमवारी ग्रंथ दिंडी आणि प्रदर्शनाचे आयोजन केले होते. ही ग्रंथ दिंडी लेझीम, ढोल- ताशांच्या गजरात पालिका मुख्यालयासमोरील चौकापासून सुरू होऊन परमार्थ निकेतन, ज्ञानराज मंदिर मार्गे पुन्हा महापालिका मुख्यालय प्रांगण अशी काढण्यात आली होती. फुलांनी सजविलेल्या दिंडीत ज्ञानेश्वरी, भारताचे संविधान, आणि वि. स. खांडेकर, वि. वा. शिरवाडकर, विंदा करंदीकर आणि भालचंद्र नेमाडे या ज्ञानपीठ पुरस्कार विजेत्यांचे साहित्य होते. ग्रंथ दिंडीत अतिरिक्त आयुक्त संदीप



माळवी, प्रशांत रोडे, उपायुक्त जी. जी. गोदापुरे, उपायुक्त उमेश बिरारी, उपायुक्त अनघा कदम आणि सर्व कर्मचारी पारंपरिक वेशभूषेत सहभागी झाले होते. ग्रंथ दिंडी विसर्जित झाल्यानंतर नरेंद्र बल्लाळ सभागृहात आयोजित केलेल्या ग्रंथ प्रदर्शनाचे उदघाटन माळवी, रोडे यांच्यासह इतर अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत झाले. कथा, कादंबरी, कविता, लेख यांसह संत दर्शन, नाटक, वेद, उपनिषद, पुराण, भागवत, कोश, प्रवासवर्णन, चरित्र, कुलवृत्तांत यासारखे नवे-जुने साहित्य ग्रंथ प्रदर्शनात मांडले होते. आयुक्त सौरभ राव यांनी ग्रंथ प्रदर्शनाला भेट दिली. कार्यक्रमाचे निवेदन राजेंद्र पाटणकर यांनी केले.


# स्क्रॅपपासून फुलपाखरू



**दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता/ ठाणे(प्रतिनिधी) :**
भंगार टायर, ट्युब, आदींसह इतर टाकाऊ कचऱ्यापासून टिकावू वस्तु तयार करण्यासाठी महापालिकेच्या घनकचरा विभागाने पावले उचलली आहेत. त्यातूनच सध्या महापालिका मुख्यालय, उपवन तलाव, नागला बंदर, आदी ठिकाणी याच टाकाऊ वस्तूपासून महापालिकेने विविध वस्तू तयार केल्या असून, त्या सध्या आर्कषणाच्या विषय ठरल्या आहेत. त्यातही यांत्रिक फुलपाखरू नागरिकांची लक्ष वेधत आहे. भंगार कचऱ्याचा पुनर्वापरही करता १०० किलो सायकल, टायर, प्लास्टिक पाइप, आर्दीचा वापर येणे शक्य नसते; परंतु अशा टाकाऊ वस्तूंचा वापर करून महापालिकेने वेगवेगळया आणि आकर्षक वस्तू तयार केल्या आहेत. यातून साकारलेले यांत्रिक फुलपाखरू सध्या महापालिका मुख्यालयात बसविण्यात आले आहे. हे फुलपाखरू तयार करण्यासाठी १२० किलो साहित्य वापरण्यात आले आहे. त्यात है कचरा, स्क्रैप धातु सायकल टायर, रिंग, आर्दीचा वापर करण्यात आला आहे. महापालिका मुख्यालयासह उपवन तलाव व नागला बंदर येथेही अशाच वस्तूंचा वापर करुन नवनवीन संकल्पना कार्यान्वित करण्यात आल्या आहेत. पालिका मुख्यालयासह उपवन तलाव, नागला बंदर येथे अशाच वस्तूंचा वापर करुन नवनवीन संकल्पना कार्यान्वित करणार ठाणे कसं बदलतंय ? ठाणे बदलतंय या संकल्पनेवर आधारित ठाणे कसं बदलतंय याचा ऊहापोह करण्यात आला आहे. त्यासाठी १८० किलो प्लास्टिक, ई कवरा, आदी साहित्याचा वापर करण्यात आला आहे. तंत्र फुलपाखरू यासाठी १२० किलो ई कचरा, स्क्रैप धातु, सायकल टायर, रिंग, आदींचा वापर करण्यात आला आहे. टायर टू ट्रेजर टायर जाळल्याने त्यातून प्रदूषणात वाढ होत आहे. टायर पडून राहिल्यास त्यात पाणी साचून डासांची उत्पत्ती होत असते. त्यातून डेंग्यू, मलेरियासारखे रोग पसरतात त्यामुळे अशा टायरपासून टायर टू ट्रेजर ही संकल्पना राबविण्यात आली आहे. यासाठी १२० किलो निष्काम टायर, लाकूड, आदींचा वापर करण्यात आला आहे. सायकल टू सस्टेन्हिलिटी यासाठी १०० किलो सायकल, सायकल टायर, प्लास्टिक पाइप, आर्दीचा वापर करण्यात आला आहे. या साहित्यातून कलाकृती साकारण्यात आल्या आहेत.

# उदयानातील खेळणी , जिमचे साहित्य तुटल्यास तात्काळ दुरुस्ती

## – मुख्य उदयान अधिक्षक संजय जाधव



**दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता/कल्याण(प्रतिनिधी) :**
कल्याण डोंबिवली महानगरपालिका परिक्षेत्रातील मैदाने,उदयाने आणि इतर अनेक अशा सुमारे २५० ठिकाणी नागरिकांच्या सुविधेसाठी ओपन जिम व त्यासाठी लागणारी व्यायामाची साधने आणि लहान मुलांसाठी खेळणी महापालिकेमार्फत बसविण्यात आली आहेत. महापालिकेने दिलेल्या या सुविधेचा फायदा महापालिका क्षेत्रातील अनेक आबालवृद्धांना होतो तथापि सततच्या वापराने ही खेळणी व ओपन जिम मधील व्यायामाची साधने तुटण्याच्या घटना निदर्शनास येतात.
त्यामुळे महापालिका आयुक्त डॉ.इंदु राणी जाखड़ यांच्या निर्देशान्वये महापालिकेने बसविलेली खेळणी ओपन जिम मधील साहित्य इ. च्या दुरुस्ती साठी महापालिकेच्या वार्षिक अंदाज पत्रकात निधीची तरतुद करण्यात आली आहे आणि त्यानुसार कल्याण व डोंबिवली साठी एकूण ३ वर्षाकरिता स्वतंत्र निविदेस मंजूरी देण्यात आली आहे. आणि प्रत्यक्षात कामालाही सुरवात झाली आहे . असे असतानाही एखादया उदयानातील खेळणी अथवा ओपन जिमची साधने तुटल्याचे निदर्शनास आल्यास तात्काळ महापालिकेच्या उदयान विभागाशी संपर्क साधावा असे आवाहन महापालिकेचे मुख्य उदयान अधिक्षक संजय जाधव यांनी केले आहे.

# वनविभागात सरकारी नोकरीची सुवर्णसंधी




सरकारी नोकरीच्या शोधात असणाऱ्या तरुणांसाठी महत्वाची बातमी आहे. महाराष्ट्राच्या वनविभागात नोकरी करण्याची सुवर्णसंधी तुमच्याकडे आहे. वनविभागात विविध प्राण्यांचा, पक्ष्यांचा बचाव करणे, त्यांना काही लागल्यावर उपचार करणे, वन्यप्राण्यांचा अभ्यास करण्यासाठी ही भरती राबवण्यात येणार आहे.
महाराष्ट्र शासन वनविभागाने या नोकरीबाबत जाहिरात प्रकाशित केली आहे. या नोकरीसाठी इच्छुक उमेदवारांनी लवकरात लवकर अर्ज करायचा आहे. या नोकरीसाठी तुम्हाला ऑनलाइन आणि ऑफलाइन पद्धतीने अर्ज करता येणार आहे. अर्ज करण्याची शेवटची तारीख २२ जानेवारी २०२५ आहे. पदाचे नाव - पशुवैद्यकीय डॉक्टर आणि जीवशास्त्रज्ञ पदसंख्या - 02 जागा शैक्षणिक पात्रता - शैक्षणिक पात्रता पदाच्या आवश्यकतेनुसार आहे (मूळ जाहिरात वाचावी.) वयोमर्यादा - 25 - 38 वर्षे अर्ज पद्धती - ऑफलाईन / ऑनलाईन (ई-मेल) ई-मेल पत्ता - [email protected] अर्ज करण्याची शेवटची तारीख 22 जानेवारी 2025 निवड प्रक्रिया - मुलाखती अधिकृत वेबसाईट - mahaforest.gov.in अन्य महत्वाच्या भरती वनविभागातील या नोकरीसाठी २५ ते ३८ वयोगटातील उमेदवार अर्ज करु शकतात. या नोकरीसाठी उमेदवारांची निवड ११ महिन्याच्या कालावधीसाठी केली जाणार आहे. पशुवैद्यकीय डॉक्टर पदासाठी अर्ज करणाऱ्या उमेदवाराने B.V.Sc पदवी प्राप्त केलेली असावी. जीवशास्त्रज्ञ पदासाठी अर्ज करणाऱ्या उमेदवाराने B.V.Sc/ B.Sc in Zoology पदवी प्राप्त केलेली असावी. २ जागांसाठी ही भरती करण्यात येणार आहे. या नोकरीसाठी उमेदवारांना २५००० ते ५०,००० रुपये पगार मिळणार आहे. या पदासाठी उमेदवारांना अर्ज ऑफलाईन / ऑनलाईन (ई-मेल) पद्धतीने करायचा आहे. अर्ज करण्यापुर्वी उमेदवारांनी नोटिफिकेशन काळजीपूर्वक वाचावे. अर्ज व आवश्यक कागदपत्रे वरील दिलेल्या संबंधित पत्त्यावर पाठवावे. तसेच, अर्जाची प्रत वरील संबंधित ई-मेल पत्त्यावर पाठवावी. उमेदवारांनी आवश्यक कागदपत्रे अर्जासोबत जोडावी. ऑनलाईन अर्ज करण्याची शेवटची तारीख 22 जानेवारी 2025 आहे. अधिक माहिती करिता कृपया दिलेली PDF जाहिरात बघावी.

# बॅनरवर ठामपाची कारवाई

**दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता/ ठाणे(प्रतिनिधी) :**
ठाणे महापालिकेच्या अतिक्रमण नियंत्रण विभागाने शहरात अनधिकृतपणे लागत असलेल्या पोस्टर, बॅनरविरोधात कारवाईचा बडगा उगारण्यास सुरुवात केली आहे. त्यानुसार डिसेंबर ते जानेवारी या कालावधीत शहरात लागलेले ३०२८ बॅनर, पोस्टर उतरविण्यात आले आहेत. तसेच ७४ जणांवर फौजदारी गुन्हे दाखल करण्यात आल्याची माहिती महापालिकेकडून देण्यात आली. मात्र, असे असले तरीदेखील आजही शहराच्या अनेक भागात बॅनर, पोस्टर लागलेलेच दिसत आहेत. किंबहुना त्यावर



कारवाईही होताना दिसत नाही, अशी नागरिकांची तक्रार आहे. न्यायालयाने शहर विद्रुपीकरणात भर घालणाऱ्या अनधिकृत बॅनर, पोस्टर, फलकांवर कारवाई करण्याच्या सूचना स्थानिक स्वराज्य संस्थांना दिल्या आहेत. त्यानुसार ठाणे महापालिकेने ६ डिसेंबर २०२४ पासून शहराच्या विविध भागांत असलेले पोस्टर, बॅनरविरोधात कारवाई सुरू केली आहे. मात्र, त्यानंतरही आज शहराच्या विविध भागांत राजकीय नेत्यांचे वाढदिवस, नेत्यांना शुभेच्छा, नेत्यांच्या आगमनानिमित्त शुभेच्छा देणारे टर, बॅनर झळकत आहेत.
अज्ञातांवर गुन्हे, कारवाईबाबत संभ्रम शहरातील मुख्य महामार्ग, अंतर्गत रस्त्यांवरही अशा पद्धतीने छोट्या- मोठ्या स्वरूपात बॅनर, पोस्टर लागत असल्याचे चित्र आहे. त्यामुळे पालिका करत असलेल्या कारवाईबाबतही संभ्रमावस्था निर्माण होत आहे. त्यातही ज्यांनी हे बॅनर, पोस्टर लावलेले असतात किंबहुना ज्यांनी शुभेच्छा दिलेल्या असतात, त्यांच्यावर गुन्हा दाखल होत नाही. महापालिका केवळ अज्ञातावर गुन्हा दाखल करताना दिसत आहे.

# एमआयडीसीत कचऱ्याला आगी लावण्याच्या प्रकारात वाढ

**दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता/ कल्याण(प्रतिनिधी) :**
डोंबिवली एमआयडीसी निवासी मध्ये रस्त्याच्या कडेला जमा झालेला कचरा पालापाचोळा व त्यात लोकांनी आणून टाकलेल्या कचऱ्याला काही लोकं आगी लावत असल्याचे दिसत असून त्यामुळे झाडांना धोका पोहोचत आहे. शिवाय या कचऱ्यात प्लास्टिक असल्याने मोठ्या प्रमाणात प्रदूषण होत आहे. या लागलेल्या आगी जवळच पथदिवे असल्याने एखादी दुर्घटना घडू शकते. एकंदर या आगीमुळे होत असलेले झाडांचे नुकसान आणि



प्लास्टिक ज्वलनातून होणारे प्रदूषण यामुळे पर्यावरणाच्या समतोल बिघडत असून यावर कडक कार्यवाही कल्याण डोंबिवली महापालिकेच्या स्वच्छता विभागाने करावी अशी मागणी स्थानिक नागरिक करत आहेत. रस्त्यावरील सीसी कॅमेरे तपासले तर हे कचरा जाळणारे अज्ञात व्यक्ती सापडू शकतील.
सोमवारी सायंकाळी सात वाजण्याच्या सुमारास मिलापनगर तलाव जवळ एका पथदीव्याचा खांब आणि पिंपळाच्या झाडाजवळ जमा झालेला कचरा, प्लास्टिक, निर्माल्य याला काही अज्ञात व्यक्तींनी आग लावल्याचे पाहण्यास मिळाले. या आगीमुळे पिंपळाचा झाडाला या आगीचा फटका बसला. काही दिवसापूर्वी श्री गणेश मंदिर खत प्रकल्प जवळ जमा कचऱ्याला अशीच आग लावल्याने काही झाडे जळाली असल्याची माहिती सामाजिक कार्यकर्ते राजू नलावडे यांनी दिली.

# जिल्हाधिकारी कार्यालयात राष्ट्रीय मतदार दिवस !

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता
ठाणे(प्रतिनिधी) :

दि.25 जानेवारी 2025 रोजी 15 वा राष्ट्रीय मतदार दिवस राज्यस्तर, जिल्हास्तर व मतदान केंद्र स्तरावर साजरा करावयाचा आहे. या 15 व्या राष्ट्रीय मतदार दिवसासाठी "Nothing like voting. I Vote for sure" हा विषय (Theme) आयोगाकडून देण्यात आला आहे.मा. भारत निवडणूक आयोगाने दिलेल्या सूचनेनुसार दि.25 जानेवारी 2025 हा कामकाजाचा दिवस नसल्याने दि.24 जानेवारी 2025 रोजी जिल्ह्यातील सर्व कार्यालयामध्ये मतदान शपथ घेण्यात यावी (मराठी, इंग्रजी व हिंदी मधील शपथेचा नमुना सोबत जोडला आहे), असे आवाहन उपजिल्हा निवडणूक अधिकारी वैशाली माने यांनी केले आहे.या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी अशोक शिनगारे हे असतील तर जिल्ह्यातील सर्व विधानसभा मतदारसंघांचे मतदार नोंदणी अधिकारी देखील उपस्थित राहणार आहेत.या कार्यक्रमामध्ये नवमतदारांना प्रमाणपत्र देवून सत्कार करण्यात येणार आहे.तरी या राष्ट्रीय मतदार दिन कार्यक्रमास दि.25 जानेवारी 2025 रोजी सकाळी 11 वाजता नियोजन भवन, पहिला मजला, जिल्हाधिकारी कार्यालय ठाणे येथे उपस्थित राहावे, असे आवाहन उपजिल्हा निवडणूक अधिकारी वैशाली माने यांनी केले आहे.

# विकास प्रकल्पांसाठी आ.रवींद्र चव्हाण यांची मॅरेथॉन बैठक



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता
कल्याण(प्रतिनिधी) :

शहराच्या विकासासाठी कोट्यवधी रुपयांचा निधी मंजूर झालेल्या प्रकल्पांचे काम कूर्मगतीने पुढे जात असल्याने भाजप प्रदेश कार्याध्यक्ष, डोंबिवलीचे आमदार रवींद्र चव्हाण यांनी सोमवारी मुंबईत आयुक्त डॉ.इंदुराणी जाखड यांच्या प्रमुख उपस्थितीत महापालिकेची बैठक बोलावली होती. शहरातील पाणीटंचाई, फेरीवाले, अमृत, जलकुंभ उभारणी, स्व.शिवाजीशेठ शेलार मैदान, वेदपाठ शाळा, ठाकुर्लीच्या रहिवाश्यांसाठी प्रकल्प बधितांना पर्यायी घरांचे पत्र, विकास आदी विविध विषयांवर चर्चा झाली. त्या कामांना गती द्या असे चव्हाण यांनी आयुक्तांना सुचवले, त्यांनी संबंधित अधिकाऱ्यांना कामे पूर्ण करण्याचे आदेश दिले.


त्यावेळी झालेल्या चर्चेत पश्चिम येथील जलकुंभ उभारणीकरिता शासनाकडून निधी उपलब्ध आहे, परंतू पाईपलाईन शिट्टींगचे काम पूर्ण होण्यास अडीच महिने लागतील. त्या भागात पाणी वितरण व्यवस्थेचे संम्प पंपच्या भूखंडावरील असलेले अनधिकृत बांधकाम हटवण्यात येणार. पूर्व व पश्चिम येथे अमृत योजनेतून शासनाकडून १६५ कोटी रुपये मंजूर झालेले आहेत. सिव्हरेज टँक बांधकाम पूर्ण करा. पूर्व पाथर्ली झोपडपट्टी येथे असलेल्या बीएसयूपी प्रकल्पामधल्या गाळयांमध्ये नागरी आरोग्य केंद्र सुरु करण्यासाठी आमदार निधी देणार. जोशी विद्यालय ते पश्चमेला जोडणारया उड्डाणपुलाचा विस्तार म्हासोबा चौक पर्यन्त करनण्यासाठी भूसंपदानात येणाऱ्या विस्थापितांना पर्यायी घरे देण्यासाठी वाटप पत्र देणे.

भगवान काटे नगरच्या रहिवाश्यांना रेल्वेकडून निष्कासन प्रश्नावर त्यांच्या पुनर्वसनाचा कृति आराखडा करून मुख्यमंत्र्यांकडे बैठक घेणार. खंबालपाडयाचे स्व. शिवाजी शेलार मैदान विकासासाठी खा.श्रीकांत शिंदे व चव्हाण यांची संयुक्त बैठक घेण्यात येणार. शिवमंदिर रोड येथे सुसज्ज असलेली वैकुंठ स्मशानभूमि बांधकामासाठी ६ कोटी निधी मंजूर आहे. डोंबिवली पश्चिम सम्राट चौक ते रेल्वे स्टेशन व रेल्वे स्टेशन ते रामनगर परिसरात फेरीवाले नकोत. शहराला जोडणारा रिंग रुट रोडचे काम पूर्ण करणे. महापालिकेची टिळकनगरमध्ये महापालिका आरक्षित भूखंडावर अध्यात्मिक प्रशिक्षणाकरिता वेद पाठशाळा उभारणीसाठी दहा कोटींचा विकास आराखडा शासनाकडे मंजूरीसाठी पाठवणे. पूर्व-पश्चिम येथील झोपडपट्टी येथे दलित वस्ती व डॉ.बाबासाहेब आंबेडकर गलिच्छ वस्ती सुधार योजनेतून तो आराखडा शासनाकडे पाठवणार. शहरातील तलाव कामांबाबतचा १५ कोटीमधून विकास गणेश नगर, जुनी डोंबिवली खाडी किनारी गणेश विसर्जन घाट हे आराखडे करून शासनाकडे पाठवणे यावर विस्तृत चर्चा झाली.

पश्चिम येथील महाराष्ट्र मेरिटाईम बोर्ड (एमएमबी) अंतर्गत प्रस्तावित विविध विकास कामे व भारत सरकार यांच्याकडून भविष्यात प्राप्त होणाऱ्या निधी संदर्भात संबंधित अधिकाऱ्यांसमवेत चर्चा करण्यासाठी निर्देशित करण्यात यावे. गणेश नगर येथील खाडी किनारी गणेश विसर्जन घाट विकसित करणे. जुनी डोंबिवली खाडी किनारी गणेश विसर्जन घाट विकसित करणे. कोपर गांव खाडी किनारी गणेश विसर्जन घाट विकसित करणे. देवीचा पाडा खाडी किनारी गणेश विसर्जन घाट विकसित करणे या सूचना करण्यात आल्या.

# पालघर पोलीस दलाकडून 'सायबर गुन्हे मुक्त गाव' मोहीम

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता
पालघर(प्रतिनिधी) :



सध्याच्या डिजीटल युगात प्रत्येक व्यक्ती मोबाईल फोन, इंटरनेटचा वापर करत आहे. सायबर गुन्हेगार नागरीकांना वेगवेगळे आमिष दाखवणारे फोन कॉल करत असतात. काही नागरीक सायबर गुन्हेगारांच्या जाळयात अडकत आहेत. त्यामुळे सायबर गुन्हयाचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत चाललेले आहे. सायबर गुन्हेगारांकडून होत असलेली फसवणुक हा एक प्रकारचा आर्थीक दहशदवाद आहे. पालघर जिल्हयातील नागरीक सायबर गुन्हंयाना बळी पडु नये तसेच त्यांचेमध्ये सायबर साक्षरता निर्माण करण्यासाठी बाळासाहेब पाटील, पोलीस अधीक्षक, पालघर यांचे संकल्पनेतुन जनसंवाद अभियानांतर्गत पालघर जिल्हा पोलीस दलाच्या वतीने "सायबर गुन्हे मुक्त गाव" ही मोहिम राबविण्यात येत आहे. "सायबर गुन्हे मुक्त गाव मोहीम" अंतर्गत पालघर जिल्हा पोलीस दलातील अधिकारी व अंमलदार हे आपल्या गावात येवुन सायबर गुन्हे जनजागृतीसाठी सायबर गुन्हे, आर्थिक गुन्हे व वाईट चालीरीती बाबत तयार करण्यात आलेली चित्रफित दाखविणार आहेत. आपणास या सर्व विषयाबाबत काही प्रश्न असल्यास त्यासंदर्भात मार्गदर्शन करणार आहेत. बाळासाहेब पाटील, पोलीस अधीक्षक, पालघर यांनी पालघर जिल्हा पोलीस दलाच्या वतीने जिल्हयातील सर्व नागरीकांना सायबर व आर्थिक गुन्हेगारांच्या आमिषाला बळी पडू नये, तसेच आपले नातेवाईक, मित्र परिवार यांचेमध्येही जनजागृती करावी. पालघर जिल्हा सायबर साक्षर करण्यासाठी सायबर क्राईम मुक्त जिल्हा या मोहीमेसाठी सर्वांनी सहकार्य करावे असे आवाहन बाळासाहेब पाटील, पोलीस अधीक्षक, पालघर यांनी केले आहे.

# कॉपी नियंत्रणासाठी परीक्षा केंद्रांची अदलाबदली म्हणजे 'डोळ्यात केर अन कानात फुंकर'

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता
ठाणे(प्रतिनिधी) :

कॉपी मुक्त व तणाव मुक्त दहावी बारावीच्या परीक्षा पार पाडण्यासाठी केंद्र संचालक, पर्यवेक्षक व शिपाई यांची परीक्षा केंद्रे बदलणे म्हणजे "डोळ्यात केर अन कानात फुंकर" असे चालले असल्याची प्रखर टिका शिक्षण क्रांती संघटनेचे राज्य अध्यक्ष सुधीर देवराम घागस यांनी केली आहे. नुकतेच व्हिडीओ कॉन्फरन्सींगद्वारा राज्य शिक्षण मंडळाने सर्व विभागीय शिक्षण मंडळांना याबाबत निर्देश दिले आहेत.

वर्षानुवर्षे दहावी बारावीच्या ठराविक परीक्षा केंद्रांवर कॉपी चालत असल्याचे चित्र पाहावयास मिळते. परंतु अशी परीक्षा केंद्रे फार मोजकी असून त्यांवर आळा घालण्याऐवजी सरसकट राज्यातील परीक्षा केंद्रांवरील कर्मचाऱ्यांची आदलाबदल करणे अत्यंत अयोग्य असून त्यास शिक्षण क्रांती संघटनेने प्रखर विरोध दर्शविला आहे. राज्य मंडळाने आपला हा तुघलकी निर्णय मागे न घेतल्यास प्रसंगी दहावी बारावीच्या परीक्षांवर बहिष्कार टाकण्यात येईल असेही संघटनेचे राज्य अध्यक्ष सुधीर देवराम घागस यांनी सांगितले.

शहरात शाळा दोन सत्रांत भरत असतात. दहावी बारावी परीक्षांच्या वेळानुसार शाळेतील नियमित अध्यापनाचे कामही शाळांमध्ये सुरू असते. शहरी भागात सकाळपासूनच ट्राफिकची मोठी समस्या असते. यामुळे नियमित शालेय कामकाज करून बदललेल्या परीक्षा केंद्रावर वेळेत पोहचणे अवघडच नव्हे तर अशक्य आहे. अन्य परीक्षा केंद्रावर जायचे असल्यास नियमित अध्यापनाची वेळ कशी सांभाळायची अशी समस्या सर्व पर्यवेक्षण करणाऱ्या शिक्षकांसमोर उभी राहिली आहे.

याशिवाय सद्या अपार आयडी जनरेट करणे, पॅटचे पेपर, इतर सर्व ऑनलाईन सुरू असलेली कामे वेळेत होऊ शकणार नाहीत. मंत्रालय, आयुक्त शिक्षण, संचालक, बोर्ड अध्यक्ष यांमध्ये समन्वय नसल्याचेही यावरून लक्षात येत आहे. एकीकडे सीसीटीव्ही बसवणे अनिवार्य केले जाते मात्र त्यासाठीच्या खर्चाची तरतूदही शासन करत नसल्याचे सुधीर घागस यांनी निदर्शनास आणून दिले आहे.

परीक्षा केंद्रांची आदलाबदल न करता बैठे पथक, भरारी पथक व अन्य उपाययोजना आखून होणारा मानसिक त्रास, वेळेचा व खर्चाचा अपव्यय राज्य शिक्षण मंडळाने टाळावा व संबंधितांना दिलासा द्यावा अन्यथा असहकार पुकारण्यात येईल असा ईशारा सुधीर घागस यांनी निवेदनाद्वारे राज्य मंडळ अध्यक्ष शरद गोसावी यांना दिला आहे.

# लाल परीमुळे मुरबाड आगाराची भरभराट

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता
मुरबाड(प्रतिनिधी) :



एसटीचा प्रवास सुखाचा प्रवास...त्यामुळे फक्त भाविक एसटीनेच यात्रेला. यात्रा सुरू झाल्यापासून आठ दिवसात मुरबाड आगाराला मिळाले सात लाखाचे उत्पन्न. यात्रेमध्ये बसेसला भक्त भाविक व इतर प्रवासी चांगले सहकार्य केल्याने मुरबाडची लाल परी आजही यात्रेत धावत आहे.
- योगेश मुसळे,मुरबाड आगार प्रमुख

राज्यभरातील तसेच संपूर्ण ठाणे जिल्ह्यातील ऐतिहासिक यात्रा मुरबाड -म्हसा यात्रा कोट्यावधी रुपयाची उलाढाल करणारी यात्रा समजली जात आहे ही यात्रा यंदा १३ जानेवारी २०२५ रोजी सुरुवात झाली आहे आतापर्यंत यात्रेत जवळपास नऊ ते दहा लाख भक्त भाविकांनी दर्शन घेतले आहे. तसेच यात्रेतील भक्त भाविक यांना येण्यासाठी व जाण्यासाठी मुरबाड आगारातील लाल परी सज्ज झाल्याचे चित्र दिसून आले. यात्रेमध्ये लाल परीने आठ दिवसात १२९४ फेऱ्या मारल्या व १६८६ किलोमीटर मुरबाड -म्हसा,म्हसा-मुरबाड अशी लाल परी धावली,, तेव्हा मुरबाड आगराला आठ दिवसात ७लाख ७७ हजार५७५ रुपये इतके उत्पन्न मिळाले आहे. अशी माहिती मुरबाड आगारप्रमुख योगेश मुसळे यांनी दिली आहे. सुरक्षीत प्रवासा साठी म्हसा यात्रेकरूनी यंदा एसटीला भक्त भाविकांनी चांगली पसंती दिल्याने यंदाही मुरबाड आगाराला आठ दिवसात सात लाखाच्या वर उत्पन्न मिळाले आहे. त्यामुळे मुरबाड आगराने दरवर्षी प्रवासासाठी चांगल्या बसेस उपलब्ध करून दिले आहे या बसेस मध्ये म्हसा यात्रेत जाणारा भकत भाविक हा खाजगी वाहनाने प्रवास न करता राज्य परिवहन महामंडळाच्या बसने प्रवास करत आहे ही परंपरा आजही मुरबाड आगारातून दिसून येत आहे त्यामुळे श्री खामलिंगेश्वराची कृपास म्हणावे लागेल आजही भक्त भाविक मुरबाडच्या लाल परीने प्रवास करत आहेत.

# लोकांचे प्रश्न सोडविणे हेच माझे कर्तव्य - आ.राजेंद्र गावित

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता
पालघर(प्रतिनिधी) :



विधानसभा २०२४ च्या निवडणूकीत वाजवी पेक्षा बहुमताने निवडून आलेले सत्ताधारी पक्षातील मी आमदार असलो तरी, माझ्या मतदारसंघातील तमाम जनतेच्या अडचणी, त्यांच्या समस्या आदी सोडविणे माझे पहिले काम - हेच माझे पुढील मिशन आहे.

याच अनुषंगाने दिनांक २० जानेवारी २०२५ रोजी राजेंद्र गावीत हे त्यांच्या पालघर बोईसर रोडवरील मिशन कंपाऊंड येथील, "अलम-आशीष" या निवासस्थानी आलेले असतांना, विविध समस्याग्रस्त मतदारसंघातील, मतदार - नागरिकांनी आपले स्थानिक प्रश्न, तक्रारी, आणि विविध अडी- अडचणी यांचे निवारण कसे करावे, यासाठी मार्गदर्शन, घेण्यासाठी व लालफितीत अडकले कामे, दिरंगाई, पाठपुरावा करूनही कामे होत नाही. झारीतील शुक्राचार्य यांच्या कडून होत असलेल्या अडचणी - सोडविण्यासाठी. स्थानिक नागरिकांनी थेट आमदार राजेंद्र गावित यांच्याकडे धाव घेत असल्याचे यावेळी दिसून येत आहे. यावेळी समस्या घेऊन आलेल्या समस्या ग्रस्त मतदारसंघ बांधव यांच्याशी बोलताना, गावित म्हणाले की,मा. धर्मवीर आनंद दिघे साहेब यांनी ठाण्यातील टेंभी नाक्यावरील आनंद आश्रमात जनतेच्या समस्या सोडवण्यासाठी घेतलेला पुढाकार हा आदर्श मानून, तसेच शिवसेना मुख्यनेते उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी माझ्यावर दाखवलेला विश्वासास, विश्वासार्हत राहून. त्यांच्या नेतृत्वाखाली लोकांचे प्रश्न सोडविणे हेच माझे कर्तव्य आहे.

माझ्या माजी आणि आजी कार्यकाळात केलेल्या आणि करीत असलेल्या विकासकामे व समस्यांवर तोडगा काढणे हेच माझे यापुढील मिशन राहील. समस्याग्रस्त - मतदार बांधव, स्थानिक नागरिक यांच्या साठी, स्वच्छ पाणीपुरवठा, रस्त्यांची दुरवस्था सुधारणा, आरोग्य सुविधा तसेच रोजगाराच्या संधींसंदर्भात अनेक समस्या आहेत. त्यावर त्वरित उपाययोजना केल्या जातील. याबद्दल आलेल्या समस्याग्रस्त यांना गावित यांनी, यावेळी उपस्थित असलेले स्थानिक लोकप्रतिनिधी, कार्यकर्ते आणि पदाधिकारी याच्या समोर देऊन, उपस्थित असलेल्या सरकारी अधिकारी वर्ग यांचे ही कान ही पाळले. व सांगितले यापुढेही, माझ्या कार्यक्षेत्र येणाऱ्या विभागातील तळागाळातील समस्यांवर लक्ष देऊन त्या सोडविण्यासाठी ते प्रयत्नशील राहील. तसेच माझ्या पालघर मधील अलम-आशीष निवासस्थानी ( मिशन कम्पाउंड ) येथे दर आठवड्याला जनतेच्या अडचणी समजून घेण्यासाठी बैठकांचे आयोजन केले जाईल,

# कंत्राटी वीज कामगारांबाबत प्रशासनास सूचना करणार - राम शिंदे

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता
कल्याण(प्रतिनिधी) :



महाराष्ट्र विज कंत्राटी कामगार संघांच्या शिष्टमंडळाला आश्वासन

वीज कंत्राटी कामगारांच्या प्रश्नांवर शासन सकारात्मक असून उर्जा प्रशासन व कामगार खात्यामध्ये समन्वय साधून वीज कंत्राटी कामगारांना योग्य न्याय देण्यासाठी शासन प्रयत्नशील राहील. राज्याचे मुख्यमंत्री तथा ऊर्जामंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिलेल्या सर्व सुचनेचे पालन तंतोतंत करावे अशी सूचना वीज कंपनी व कामगार विभाग प्रशासनातील वरिष्ठ अधिकारी वर्गाला सूचना करणार असे आश्वासन विधान परिषदेचे सभापती राम शिंदे यांनी महाराष्ट्र वीज कंत्राटी कामगार संघा ( संलग्न भारतीय मजदूर संघ ) च्या पदाधिकाऱ्यां सोबत चर्चा करताना दिले आहे.

भारतीय युवक कल्याण केंद्राच्या कार्यालयात ते आले असता महाराष्ट्र वीज कंत्राटी कामगार संघांचे प्रदेश अध्यक्ष निलेश खरात , सरचिटणीस सचिन मेंगाळे, संघटनमंत्री ऊमेश आणेराव व उपसरचिणीस राहूल बोडके तसेच भारतीय युवक कल्याण केंद्राचे सचिव विकास माने, पश्चिम महाराष्ट्र समरसता गती विधीचे रवी ननावरे व जेजुरी देवसंस्थानचे विश्वस्त राजेंद्र खेडकर इत्यादी प्रमुख उपस्थित होते.

उर्जामंत्री देवेंद्र फडणवीस यांनी वीज कंत्राटी कामगार संघा सोबत मीटिंग घेऊन वीज कंत्राटी कामगार हितार्थ अनेक सकारात्मक निर्णय घेतले मात्र प्रशासन त्याची अंमलबजावणी करताना दिरंगाई करत असल्याने काही कंत्राटदार व अधिकारी हे संगनमताने या वीज कंत्राटी कामगारांचे आर्थिक शोषण करत असल्याचा आरोप अध्यक्ष निलेश खरात यांनी केला.

आर्थिक व सामाजिक सुरक्षेसाठी अजुनही संर्घष करावा लागत असल्याने दोषी कंत्राटदार व मुख्य नियोक्ता यांच्या वर सनदशीर मार्गाने कारवाई करावी अशी मागणी सरचिटणीस सचिन मेंगाळे यांनी केली.

राज्यातील विविध ऊद्योगातील कंत्राटी महिला कामगारांना कायद्यातील तरतूदी नुसार वेतन, सामाजिक सुरक्षा योजना, रोजगारात सुरक्षितता, काही कंत्राटदारांच्या चालू असलेल्या बेकायदेशीर कृती, पगारातून चाललेली लुट व अन्य अनेक कामगारांच्या समस्या बाबत राम शिंदे यांना ठेकेदार कामगार संघ संलग्न भारतीय मजदूरसंघ भारतीय मजदूर संघाच्या वतीने निवेदन देण्यात आले.

# कल्याणमध्ये रंगला माय मराठीचा जागर




दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता
कल्याण(प्रतिनिधी) :

मराठी भाषा आणि संस्कृती जिवंत ठेवणे ही तर काळाची गरज आहे. म्हणूनच सध्या सर्वत्र मराठी भाषा पंधरवडा साजरा केला जातोय. यानिमित्ताने मराठी भाषा, साहित्य, संगीत, खाद्य, बोलीभाषा, पेहराव अशा विविध अंगांना स्पर्श करून जाणारा मेघा विश्वास निर्मित "My बोली साजिरी... मराठी मनाचा Canvas!" या अभिवाचनात्मक संगीतमय कार्यक्रमाचे आयोजन कल्याणच्या पंडितवाडी सभागृहात रविवारी करण्यात आले होते.

या कार्यक्रमात सुप्रसिध्द वृत्त निवेदक अमेय रानडे, निवेदिका तपस्या नेवे, समीर सुमन, डॉ. मेघा विश्वास यांनी अभिवाचन केले. गायक वरून देवरे याच्या मर्मबंधातली ठेव या नाट्यगीताला तर अमित दांडेकर यांनी गायलेल्या जीवाशिवाची बैल जोड या गाण्याला रसिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. ढोलकीवर शशांक पडवळ आणि साईड रिदमवर रुपेश गांधी यांनी साथ केली. कार्यक्रमाला रसिकांचा उत्तम प्रतिसाद मिळाला.

जीवनदीप शैक्षणिक संस्था,पोई संचलित
जीवनदीप कौशल्य विकास केंद्र गोवेली
कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग संचलित
प्रवेश सुरु! प्रवेश सुरु! प्रवेश सुरु!

| | | |
|---|---|---|
| १ | बांधकाम पर्यवेक्षक (कोड नं.३०४२०२) | कालावधी १ वर्ष |
| २ | पॅथोलॉजी टेक्नीशियन (कोड नं.२०१२३०) | कालावधी १ वर्ष |
| ३ | जनरल नर्सिंग आणि मिडवाइफरी असिस्टंट (GNMA) (कोड नं.२०१२३७) | कालावधी १ वर्ष |
| ४ | डिप्लोमा कोर्स इन मेडिकल लॅब टेक्निशियन (DMLT) (कोड नं.२०१४०४) | कालावधी २ वर्ष |
| ५ | सिक्युरिटी ॲण्ड फायर प्रिव्हिजन प्रशिक्षण (कोड नं.४११११२४) | कालावधी ६ महिने |

पात्रता : १० वी / १२ वी / पदवी
संपर्क : जीवनदीप कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय गोवेली, पो.रायते, ता.कल्याण, जि.ठाणे
Call : 8108559566 / 9158518832 / 9619188558

'ठाणे जीवनदीप वार्ता' हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक तथा संपादक श्री.रविंद्र नारायण घोडविंदे यांनी; महाराष्ट्र प्रिंटिंग प्रेस, हाऊस नंबर ८६२, उलनचाळ, अंबरनाथ (पश्चिम), जिल्हा - ठाणे, महाराष्ट्र - ४२१५०५ येथे छापून, एम/ए-१०६, एम टाईप बिल्डिंग, कृषी उत्पन्न बाजार समिती आवार, फोर्टीस हॉस्पिटल समोर, बैलबाजार, कल्याण (प.) जि.ठाणे ४२१३०१ येथून प्रसिद्ध केले.
(या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या, लेख, जाहिराती इत्यादींशी संपादक सहमत असतीलच असे नाही)
मुख्य कार्यालय - एम/ए-१०६, एम टाईप बिल्डिंग, कृषी उत्पन्न बाजार समिती आवार, फोर्टीस हॉस्पिटल समोर, बैलबाजार, कल्याण (प.) जि.ठाणे ४२१३०१
संपर्क क्रमांक : ९६१९१८८५५८, E Mail - jeevandeepvartanews2020@gmail.com / news.thanejeevandeep@gmail.com
RNI NO : MAHMAR/2016/72091 g Postal Registration No. THC/256/2022-2024 (सर्व कायदेशीर न्यायनिवाडा मा.कल्याण सत्र न्यायालयात) कायदेविषयक सल्लागार - ॲड. जयकुमार ए. रिजवानी